**वाचले :-**

१. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४
२. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३. सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.
४. या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.१५/२० दि.२२/०३/२०२०.
५. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, मुंबई यांचेकडील पत्र क्र/मत्स्य/जिपास/०३१७०१/७३-११/६०/२०२० दि.२३/०३/२०२०.
६. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, पालघर यांचेकडील पत्र क्र/जिअकृअपा/गुनि/ कृनिपु/१०२९/ २०२० दि.२४/०३/२०२०.

जिल्हा दंडाधिकारी पालघर
जिल्हा पालघर
सत्यमेव जयते

---

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.१६/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दि.२४/०३/२०२०

**सुधारित आ दे श**

ज्याअर्थी या कार्यालयाचे उपोद्घातातील आदेश क्र.४ अन्वये करोना विषाणुच्या (कोव्हिड १९) प्रसारामुळे मानवी जीवन, आरोग्य व सुरक्षितता धोक्यात आल्याने सदर विषाणुची लागण एका संक्रमित रुग्णाकडून अन्य व्यक्तीस / इसमास त्याच्या संपर्कात आल्याने होण्याची शक्यता विचारात घेता पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रामधील वसई विरार शहर महानगरपालिका, नगरपरीषद पालघर, डहाणू, जव्हार, नगरपंचायत मोखाडा, वाडा, विक्रमगड, तलासरी तसेच ग्रामीण भागातील बोईसर व तारापूर ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये दि.२३/०३/२०२० रोजी पहाटे ५.०१ ते दि.३१/०३/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत त्यांचे राहते घर/राहण्याचे ठिकाण सोडून कोणत्याही सार्वजनिक/खाजगी ठिकाणी, परीसरातील रस्ते, हमरस्ते, सार्वजनिक मार्ग या ठिकाणी प्रवेश करणे, फिरणे, उभे राहणे, ताटकळणे, भटकणे, वाहन चालविणे या व यासारख्या कृतींना मज्जाव करण्यात आलेला असून त्यातून अत्यावश्यक व जीवनावश्यक आस्थापनांना वगळण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.५ अन्वये आयुक्त, मत्स्य व्यवसाय, मुंबई यांनी मत्स्य खादयाचा व कोळंबी खादयाचा समावेश हा Essential Commodities म्हणून होत असल्याने त्याची वाहतूक सुरु ठेवणेकामी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, पालघर यांनी बियाणे, खते व औषधांची दुकाने जी जिवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मध्ये समाविष्ठ होत असल्याने पालघर जिल्हयातील कृषी निविष्ठा विक्री केंद्रे सूरु ठेवणेबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या कार्यालयाचे उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये निर्गमित आदेशातून ज्या अत्यावश्यक व जीवनावश्यक सेवा पुरविणाऱ्या खालील आस्थापनांना यातून वगळण्यात आल्या आहेत, त्यात खालील आस्थापनांचा नव्याने समावेश करीत आहे.

१) मत्स्य खादय व कोलंबी खादय व त्याची वाहतूक (आवश्यक फलक लावून)
२) कृषी निविष्ठा विक्री केंद्रे व त्याची वाहतूक (आवश्यक फलक लावून)

सदरहू आदेश अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्था/ व्यक्ती यांना / त्यांचे वाहनांना लागू असणार नाही.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि.२४/०३/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

सही/-xxx
(डॉ.कैलास बा. शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत:-**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.
४) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.
५) आयुक्त मत्स्यव्यवसाय, मत्स्य व्यवसाय विभाग, तारापूरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४००००२ यांना माहितीस्तव.
६) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पालघर साई प्रसाद बिल्डींग, लोकमान्य नगर, नवली, पालघर (प.)-४०१४०४ यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०) सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय, पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
११) मुख्याधिकारी, नगरपरीषद जव्हार/डहाणू/पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१२) मुख्याधिकारी, नगरपंचायत वाडा/विक्रमगड/मोखाडा/जव्हार यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१४) ग्रामपंचायत बोईसर, तारापूर, यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१५) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी.
१६) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती तथा प्रसिध्दीकरीता.

जिल्हा दंडाधिकारी पालघर ★ जिल्हा पालघर ★

**जिल्हादंडाधिकारी पालघर**